संपादकीय....

## नोकरी टिकविण्यासाठी त्यांना व्हावे लागते व्यसनाधिन

शहरातील उच्चभ्रू समाजातील युवक मौजमजा, चैन करण्यासाठी हुक्का पार्लरमध्ये येऊन व्यसन करताना आढळतात. तर दुसऱ्या बाजुला पार्लरमधील हुक्का पेटवून देण्याचे काम करणारे केवळ नोकरी टीकावी म्हणून अवघ्या वीस बावीस वर्षातील युवक कधी व्यसनाच्या आहारी जातात हे त्यांना सुध्दा कळत नाही. ही खरी समाजातील शोकांतिका असल्याचे दिसून येते. शहरातील विमाननगर, कल्याणीनगर, कोरेगाव पार्क, मुंढवा, कोंढवा, बाणेर, औंध, कात्रज, कोथरुड, वारजे, सिंहगड रस्ता, हिंजवडी, रावेत, थेरगाव, रहाटणी अशा परिसरातील हॉटेल्समध्ये वेटरचे काम करणारी मुले हुक्का पेटविण्याचे काम करतात. हुक्का चांगला पेटण्यासाठी ही मुले आधी स्वत: हुक्का ओढतात. पार्लरमध्ये अनेकजण शौक किंवा व्यसनामुळे हुक्का ओढण्यासाठी येतात. अशा डझनभर ग्राहकांचे हुक्के पेटविण्यासाठी त्यांना रात्रभर हुक्क्याचे झुरके ओढावे लागतात. त्यामुळे ते नकळत कधी व्यसनाच्या आहारी जातात हे त्यांना कळतच नाही. या व्यसनाधिनतेमुळे त्यांचे गाल आत तर डोळे खोलवर गेलेले दिसतात. रात्रभर झोप नसते. दिवसा काही तास झोप घेतल्यानंतर पुन्हा नोकरी टिकविण्यासाठी कामावर जावे लागते. त्यामुळे हे कामगारच अधिक नशेमध्ये असतात. हुक्क्यासाठी लागणारे कोळशाचे पेटते निखारे देणे, ग्राहकाला हुक्का ओढताना किक बसली नाही कि पुन्हा दुसरा हुक्का आणून देणे. तो हुक्का चांगला व्हावा म्हणून भराभर हुक्क्याचे झुरके घेणे त्यांचे रात्रभर सुरू असते. श्रीमंत कुटुंबातील व्यसनाधीन गेला तर त्याला परत व्यसनमुक्ती केंद्रात ठेऊन त्यांना व्यसनमुक्त करणे शक्य असते. मात्र कुटुंबाचा आधार असलेल्या मुलांचे भविष्य काय असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. अशा मुलांना व्यसनामुळे इतर आजार ओढवल्यास त्यांना कामावरून काढून टाकले जाते. अशा असंख्य युवकांचे पुढे काय होते, असा प्रश्न पडतो. मात्र, याची काळजी ना सरकारला ना पोलीसांना असते. कित्येक पिढ्या व्यसनाधीतेमध्ये अडकुन आपले आयुष्य संपवितात. यामध्ये शौक म्हणून श्रीमंत आणि पोटासाठी नोकरी म्हणून काम करणारे गरीब या दोन्ही वर्गातील युवकांचे आयुष्य बरबाद होते. यावर कायमस्वरुप उपाययोजना कधी होणार हा खरा प्रश्न आहे.

हुक्का पेटविणारी मुले खरीच व्यसनाधीन झाल्याच्या अनेक घटना आहेत. मात्र त्यांना व्यसनमुक्ती केंद्रात येऊन उपचार घेणे परवडत नाही. अशा मुलांचे भविष्य अंधकारमयच असते. सरकारने मोफत व्यसनमुक्ती केंद्र सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे व्यसनमुक्ती केंद्र चालकांचे मत आहे. तर कंपनीत हाऊस किपिंगचे काम करत होता. काम गेल्यामुळे पर्याय नव्हता म्हणून हॉटेलमध्ये वेटरचे काम करतो. मात्र आलेल्या ग्राहकांना हुक्का पेटवून द्यावा लागतो. याचे व्यसन झाले आहे. ग्राहकांना हुक्का पेटवता पेटवता तो ओढत नाही तो पर्यंत बरे वाटत नसल्याचे वेटरने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

काही मुले केवळ पोटासाटीं तर अनेकजण व्यसन म्हणून हुक्का पार्लर मध्ये जातात. यातील अनेक जण कमी वयात मृत्युमुखी पडतात. त्यामुळे अनेक पालकांना आपले पाल्य गमावतात. या हुक्का पार्लर संस्कृतीमुळे एक नवा सामाजिक प्रश्न निर्माण झाला आहे.

वेटर म्हणून काम करणाऱ्या मुलांना केवळ व्यसनच लागत नाही तर त्यांच्या मानसिक आरोग्यावरही गंभीर परिणाम होतो. सतत धुरामध्ये राहिल्यामुळे श्वसनाचे विकार, दमा, ब्राँकीटिस यासारखे आजार लहान वयातच बळावतात. अभ्यास किंवा कौशल्यविकास यासाठी वेळ मिळत नाही. परिणामी, ते एका चुकीच्या चक्रात अडकून बसतात – काम, व्यसन, आजार आणि पुन्हा काम. समाजात यांचे स्थान दुय्यम ठरते आणि ते आपल्या भविष्यातील स्वप्नांपासून दूर जातात.

यापैकी अनेक युवक खेड्यापाड्यातून शहरात आलेले असतात. कुटुंबाची आर्थिक जबाबदारी सांभाळण्यासाठी ते अशा कामांमध्ये उतरतात. गावाकडील पालकांना शहरातील या व्यसनाधीनतेची कल्पनाच नसते. माझा मुलगा शहरात मोठं काहीतरी करतोय; असा त्यांचा समज असतो, पण प्रत्यक्षात तो हुक्क्याच्या धुरामध्ये आपले तारुण्य जाळत असतो. हे सत्य बाहेर येते तेव्हा खूप उशीर झालेला असतो. त्यामुळे ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या युवकांना योग्य मार्गदर्शन आणि नोकरीच्या संधी मिळणे आवश्यक आहे.


सरकार, प्रशासन, समाजसंस्था आणि पालक यांची संयुक्त जबाबदारी या समस्येवर आहे. फक्त हुक्का पार्लरवर छापे घालून प्रश्न सुटणार नाही. त्याचबरोबर पर्यायी रोजगार निर्मिती, युवकांना आरोग्याविषयी जागरूक करणे, शाळा-महाविद्यालयांमध्ये व्यसनमुक्तीविषयी कार्यशाळा घेणे या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, गरीब मुलांना मोफत व्यसनमुक्ती उपचार उपलब्ध करून दिले तर त्यांचे आयुष्य वाचू शकेल. अन्यथा, हुक्का पार्लर संस्कृतीमुळे अजून कित्येक कुटुंबे अंधारात ढकलली जातील.

या सर्व परिस्थितीकडे फक्त कायद्याच्या काठीने बघून चालणार नाही. युवकांच्या भविष्याचा प्रश्न आहे म्हणून व्यापक उपाययोजना करणे गरजेचे आहे. शाळा आणि महाविद्यालयीन स्तरावर व्यसनमुक्ती जनजागृती मोहीम राबवणे, हुक्का पार्लर चालवणाऱ्यांवर कडक शिक्षा करणे, तरुणांसाठी कौशल्याधारित रोजगार संधी निर्माण करणे आणि पालकांना सतर्क ठेवणे – या चारही स्तरांवर काम झाले तरच ही समस्या आटोक्यात येईल. समाजानेही हुक्का पार्लर संस्कृतीला फॅशन म्हणून न पाहता, ती एक सामाजिक व्याधी आहे याची जाणीव ठेवली पाहिजे. तरुणाई धुरामध्ये हरवू नये, तर त्यांच्या स्वप्नांना नवी दिशा मिळावी, हीच खरी काळाची गरज आहे.

शोलेः पुरे पचास साल! भाग :२

# शोले: उत्कृष्ट सिनेमाचा फॉर्म्युला ?

मागील लेखात सांगायची एक गोष्ट राहून गेली, त्यापासूनच सुरू करू या! ती गोष्ट अशी की, कोणत्या गोष्टीत, कथानकात, भूमिकेत किती पोटॅन्शिअल आहे हे कळणं कधी कधी अवघड असतं. त्यामुळेच सलीम खान यांनी शोलेतील ठाकूरची भूमिका दिलीप कुमार यांनी करावी असं सुचवलं होतं. पण दिलीप कुमार यांनी ती भूमिका यासाठी नाकारली की त्या भूमिकेत विविधता नाही, ती भूमिका एकसुरी वाटते, म्हणून दिलीप कुमार यांनी ठाकूरची भूमिका फेटाळली, आणि मग पुढे ती भूमिका संजीव कुमार यांनी अजरामर केली. मग मात्र दिलीप कुमार यांना पश्चात्ताप झाला. अशा अनेक भूमिका केवळ अतीआत्मविश्वासा पोटी दिलीप कुमार यांनी सोडल्या होत्या. म्हणजे कथेतील वा भूमिकेतील यशस्वी होण्याची शक्यता ओळखण्याची क्षमता ही केवळ अनुभवातूनच येईल अशीही शक्यता नसते. तर त्याला आरपार बघण्याची, आणि बिटविन द लाईन अर्थ समजून घेण्याचं कौशल्यही अंगी असावं लागतं आणि जे हाती आलं आहे, घेतलं आहे, वा हाती पडलं आहे, ते मी माझ्या परीने कसं उत्तम करेल? हे त्या व्यक्तीनं ठरवलं की मग त्यात त्याला समाधान आणि यश मिळतंच! तेच काम ठाकूरच्या भूमिकेत संजीव कुमार यांनी केलं. इथे आणखी एक नमूद करावीशी वाटते ती गोष्ट ही की, शोलेच्या वेळी संजीव कुमार हे गुलजार यांच्या आँधी या चित्रपटातही काम करत होते. गुलजार हरिभाईंना म्हणाले की शोले मध्ये धर्मेंद्र, हेमामालिनी, अमिताभ बच्चन, जया भादुरी, मुख्य व्हिलन अमजद खान आणखी बरेच कलाकार आहेत, त्यात तुझ्यावर ना गाणं चित्रित होणार, ना तुला कोणी हिरोईन, ना प्रणय प्रसंग, मग त्या कलाकारांच्या भाऊगर्दीत कशाला हरवून जातोस? पण गुलजार यांनी समजावल्या नंतरही हरिभाईंनी शोले सिनेमा सोडला नाही, त्यांनी सांगितले की या मध्ये माझे गब्बर बरोबर चांगले दमदार सिन्स आहेत, आणि सिनेमा सोडण्यास नकार दिला. आणि मग जेव्हा चित्रपट प्रचंड गाजला. आणि हरिभाईंच्या भूमिकेचं कौतुक झालं, तेव्हा गुलजार यांनी मान्य केले की खरंच दमदार भूमिका आहे ठाकूरची म्हणून!




भूमिकेतील यशस्वी संभाव्य शक्यता लक्षात न आल्याने, दिलीप कुमार यांनी चक्क एक नव्हे चार सर्वोत्कृष्ट भूमिका आपल्या ओव्हर कॉन्फिडन्समुळे सोडल्या! एक शोलेतील ठाकूरची, दुसरी प्यासा मधील कवी विजय म्हणजे गुरूदत्तने केलेली भूमिका, तिसरी जंजीर आणि चौथी बैजू बावरातील बैजूची भूमिका. आणि हे सर्व चित्रपट भारतीय सिनेमा क्षेत्रातील ऐतिहासिक आणि क्लासिक चित्रपट म्हणून आज ओळखले जातात.

त्यामुळे उत्कृष्ट सिनेमा बनवायचा असेल तर यशस्वी होण्यासाठीची संभाव्यता असणारं कथानक निवडणं ही पहिली पायरी आहे. बजेट जर मर्यादित असेल तर त्यानुसार कथा निवडावी. तेंव्हा मात्र कथा निवडीमध्येही मर्यादा येऊ शकतात. पण बजेट भरपूर किंवा लागेल तेवढं उपलब्ध होणार असेल, तर मग कथानक निवडीचं स्वातंत्र्य राहते.

हॉलिवूड मध्ये चित्रपट निर्मितीवर प्रचंड खर्च केला जातो. त्यामुळे त्यांच्याकडे मोठमोठे सिनेमे निर्माण होतात. तोच प्रकार लेखक आणि कादंबरी लेखनाबाबतही सांगता येईल. एखादा लेखक वा लेखिका चांगले प्रगल्भ लेखन करीत असेल आणि ते वाचकांना आवडू शकेल असे वाटले तर अशा लेखकांचे थोडे लेखन पाहून त्यांना असे मोठे प्रकाशक आधीच पुढील लेखनासाठी अगाऊ मानधन देतात, जेणेकरून त्यांना त्यांच्या मनातील विचार नेमकेपणाने कोणत्याही सांसारिक, आर्थिक अडचणींना तोंड न देता पूर्ण लक्ष लेखनावर केंद्रीत करून साहित्य निर्मिती करता येईल. धन्य ते लेखक आणि धन्य ते प्रकाशक!

शोले सिनेमातील अनेक भूमिका त्यातील पोटेन्शियल न ओळखल्याने अनेकांनी सोडल्या, आणि नंतर प्रामाणिकपणे पश्चात्तापही व्यक्त केला. त्यात प्रामुख्याने डॅनी, शत्रुघ्न सिन्हा, दिलीप कुमार आणि प्राण यांचा समावेश होतो. जगदीपने केलेल्या सुरमा भोपालीच्या भूमिकेसाठी प्राण यांचाही विचार करण्यात आला होता. पण प्राण यांना भोपाली भाषा बोलायला जमेल की नाही, असं वाटल्यानं आणि भूमिकेची लांबीही कमी असल्याने प्राण यांचा विचार सोडून, जगदीपचा विचार केला गेला. प्रथम जगदीपही ही भूमिका करायला नकार देत होता. पण जगदीपने भूमिका नाकारण्याचे कारण भूमिका पसंत न पडणे नव्हते तर त्याचे आधीच्या सिनेमाचे मानधन दिले नव्हते म्हणून तो मी काम करणार नाही असे म्हणाला, मग त्याला आधीचे आणि शोलेचे दोन्हीचे योग्य ते मानधन दिल्यावर मात्र त्याने समरसून आपली भूमिका वठवली. मात्र सिनेमा गाजल्यावर आणि या सिनेमानं इतिहास घडविल्यावर प्राणला या भूमिकेसाठी आपला विचार करण्यात आल्याचे समजले. त्यावर ते म्हणाले की मी ही भूमिका छोटी असली तरी केली असती आणि उत्तमरित्या भोपाली भाषा बोलली असती.

महबूबा महबूबा या गाण्यासाठी देखील आधी रमेश सिप्पी यांनी जयश्री टी यांचा विचार जवळ जवळ पक्का केला होता. मात्र सलीम खान यांच्या अतिशय आग्रहाखातर या गाण्यासाठी हेलन यांना घेण्यात आले. तो हेलन यांचा पडता काळ होता असं म्हणतात. त्यामुळे त्यांना कामही मिळेल आणि आर्थिक आधारही मिळेल या विचाराने सलीम खान यांनी रमेश सिप्पी यांना त्या गाण्यात घेण्याची गळ घातली. आणि अखेर हेलन यांचाही अशा रीतीने शोलेत प्रवेश झाला. मात्र त्यामुळे जयश्री टी यांची मोठी संधी हुकली!

सलीम खान हे हेलन यांना पसंत करत होते, त्यातूनच त्यांनी हेलन यांना शोले मध्ये काम देण्यात मदत केली आणि इतरही सिनेमात मदत केली. शोले सिनेमाच्या मोठ्या यशानंतर म्हणजे १९८१ मध्ये कुटुंबाचा म्हणजे पत्नी सलमा आणि चार मुले, या सर्वांचा विरोध असतानाही सलीम खान यांनी हेलन यांच्याशी विवाह केला. पण म्हणतात की हेलन यांनी अतिशय प्रेमाने आज सर्व कुटुंबाला प्रेमाने एकत्रित ठेवले आहे.

असो तर शोलेने जसं अनेकांना ऐतिहासिक सिनेमात कामाची आणि लोकप्रिय होण्याची संधी दिली तशीच अनेकांची संधी कळत नकळत हुकली सुद्धा!

**क्रमशः**



**– श्रीकांत वाघ पुणे**
**मोबाईल ९९२३३१६२११**

विशेष लेख

# शिलाहार ते मराठा राजधानीचे बळकट स्थान 'पन्हाळा'

वारणा आणि पंचगंगेची उपनदी असलेल्या कासारी नदीचा जलविभाजक असलेल्या सह्याद्रीच्या पूर्व दिशेने पसरलेल्या रांगेच्या उंच डोंगर पर्नाल पर्वत म्हणजेच पन्हाळा. पन्हाळा हा पावनगड आणि पन्हाळा असा जोड किल्ला आहे. समोरच दख्खनचा राजा म्हणून ओळखला जाणार जोतिबाचा डोंगर याच रांगेत आहे. ईशान्येला पसरलेलं वारणेचे विस्तीर्ण खोरे, पूर्व आणि दक्षिणेकडे पंचगंगा आणि कासारीचे खोरे आणि कोल्हापूर परिसर तर पश्चिमेकडे विशाळगडपर्यंतचा संपूर्ण परिसर.

शिलाहार राजा भोज यांनी बांधलेल्या किल्ल्यांपैकी एक महत्त्वाचा किल्ला म्हणजे पन्हाळा. शिलाहारांच्या कोल्हापूर घराण्याच्या राजधानीचा मान या किल्ल्याकडेच होता. या किल्ल्याच्या वास्तूरचनेतून शिलाहार कालीन वास्तू निर्मिती कशा प्रकारे होती हे दिसून येते. वाघ दरवाजा येथे असलेले मयुर आणि गरुडाचे चिन्ह हे या गडाचे प्राचिनत्व सिद्ध करते. कोकण आणि दख्खनचे पठार यांना जोडणारा महत्वाचा व्यापारी मार्ग प्राचिन काळापासून प्रचलित आहे. अनुस्कुरा घाट आणि आंबा घाट मार्गे होणाऱ्या व्यापारावर नियंत्रण ठेवणे आणि संरक्षणाच्या दृष्टीने पर्नाल पर्वत हे ठिकाण मोक्याचे व महत्वाचे असल्याचे जाणून शिलाहार राजा भोज याने पन्हाळा किल्ला बांधला आणि त्याला आपल्या राजधानीचे स्थान बनवले.

असा हा प्राचीन पन्हाळा शिलाहारांनतर यादव आणि त्यानंतर बहमनी, आदिलशाही अशा सत्ताधिशांच्या अंमलाखाली राहिला. प्रतापगडच्या युद्धानंतर आदिलशाहीमध्ये निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेत छत्रपती शिवाजी महाराजांनी कोल्हापूर पर्यंतचा आदिलशाही मुलूख जिंकला. त्याचवेळी १६५९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळा किल्लाही जिंकुन घेतला. त्यानंतर पन्हाळा किल्ल्याला आणखी मजबूत करण्याच्या दृष्टीने त्याच्या समोरच लागून असलेल्या डोंगरावर अर्जोजी यादव यांच्या देखरेखीखाली पावनगड उभारण्यात आला. यामुळे पन्हाळा आणखी भक्कम व भव्य झाला. या किल्ल्यासोबत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराराणी यांच्या जीवनातील अनेक महत्त्वाच्या घटना जोडलेल्या आहेत. मराठा इतिहासापुरता विचार करता स्वराज्यातील अनेक महत्वाच्या लढायांचा आणि प्रसंगांचा मुक साक्षीदार आहे पन्हाळा.

सिद्दी जोहरचा वेढा आणि पावनखिंडची लढाई

१६५९ मध्ये कोल्हापूर, पन्हाळा सोबतच दक्षिण कोकणचा प्रांत छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकल्यानंतर आदिलशाही दरबारामध्ये एकच गोंधळ उडाला. अशा वेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशाही दरबाराने सिद्दी जोहर या सेनापतीची नेमणूक केली. सिद्दी हा अफजल खानाइतकाच क्रूर आणि धूर्त होता. त्याने मराठ्यांसोबत युद्ध पुकारून मिरज मार्गे कोल्हापूर प्रांतावर हल्ला केला. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांनी लढाईच्या तयारीने पन्हाळा सज्ज केला. सिद्दी जोहरने पन्हाळा गडाला कडक वेढा घातला आणि छत्रपती शिवाजी महाराजांना कैद करण्याची योजना आखली. भर पावसातही वेढ्याचे काम जोराने चालवले. त्यामुळे गडावरील अन्न-धान्य व युद्ध साहित्य कमी होत चालले. या सर्वांचा विचार करून छत्रपती शिवाजी महाराजांनी वेढा फोडून निसटण्याचा बेत आखला. त्यासाठी त्यांनी शिवा काशिद या मावळ्याला वेशांतर करून सिद्दीच्या भेटीस पाठवले आणि आपण स्वतः वाघ दरवाजा उतरून विशाळगडच्या दिशेने कुच केले. शत्रूने मराठा सैन्याचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. त्यावेळी छत्रपतींसोबत रायाजी बांदल आणि त्यांचे सैन्य, शंभुसिंह जाधव,



बाजी प्रभू व फुलाजी प्रभू देशपांडे असे कसलेले योद्धे होते. त्यांनी महाराजांना सांगितले की त्यांनी विशाळगड जवळ करावा आणि आम्ही खिंडीत शत्रुला अडवून धरतो. यानुसार रायाजी बांदल आणि त्यांचे सैन्य, शंभुसिंह जाधव, बाजी प्रभू व फुलाजी प्रभू देशपांडे यांनी घोड खिंड (पावन खिंड) येथे सिद्दीच्या सैन्याला रोखून धरले. या खिंडीत झालेल्या लढाईमध्ये दुर्दैवाने हे सर्व वीर धारातिर्थी पडले. त्याचे स्मारक आजही आपल्याला पांढरे पाणी (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथे पहावयास मिळते.

पन्हाळा पुन्हा स्वराज्यात

सिद्दीच्या वेढ्यानंतर पन्हाळा पुन्हा आदिलशाहीकडे गेला. त्यामुळे कोल्हापूर प्रांतावरील मराठ्यांचे वर्चस्व धोक्यात आले. तसेच राजापूर बंदरातील व्यापारावरही त्याचा परिणाम झाला. त्यामुळे पन्हाळा पुन्हा स्वराज्यात आणण्याचा प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केला. १६७४ मध्ये हिरोजी फर्जंद या सेनापतीने अवघ्या ६० मावळ्यांनिशी रात्रीचा छापा टाकून पन्हाळा जिंकून घेतला आणि पन्हाळा पुन्हा स्वराज्यात समील झाला.

औरंगजेबाची स्वारी आणि मराठ्यांची चिवट झुंज

छत्रपती संभाजी महाराज यांनी औरंगजेबास कडवी झुंज देऊन स्वराज्याचे रक्षण केले. त्यानंतर छत्रपती राजाराम महाराज यांच्या नेतृत्वात मराठ्यांनी लढा सुरूच ठेवला. जिंजीहून आल्यानंतर छत्रपती राजाराम महाराज यांनी पन्हाळा ही राजधानी करून काहीकाळ येथूनच कारभार चालवला. यानंतर सन १७०० मध्ये राजाराम महाराज यांचा मृत्यू झाल्यानंतर महाराणी ताराराणी यांनी लढा सुरू ठेवला. महाराणी ताराराणी यांच्या नेतृत्वात मराठा सरदारांनी मुघलांना चिवट झुंझ दिली.

मराठ्यांची राजधानी पन्हाळा

महाराणी ताराराणी यांनी पन्हाळा येथे राजधानी घोषीत करून कोल्हापूर संस्थांनची स्थापना केली. यानंतर अनेक वर्ष कोल्हापूर संस्थानचा कारभार पन्हाळा किल्ल्यावरून चालत होता. याची साक्ष म्हणजे पन्हाळा किल्ल्यावर असलेले कचेरीचे वाडे.

पन्हाळा हा किल्ला बांधताना दीर्घकालीन लढाईसाठी सुसज्ज असा किल्ला उभारण्यात आला होता. समुद्रसपाटीपासून तब्बल ८४५मीटर उंचीवर, आणि ७ चौरस किलोमीटरच्या अफाट विस्तारावर उभा असलेला हा किल्ला, महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या किल्ल्यांपैकी एक आहे. पन्हाळा व पावनगड हे दोन्ही जोडकिल्ले खोल दरीच्या साहाय्याने एकमेकांशी जोडलेले आहेत. शिवकालीन लष्करी दृष्टिकोनातून या दोन किल्ल्यांची सांगड ही एक अपूर्व अशी संरक्षणयंत्रणा होती.

रचना आणि वैशिष्ट्ये

किल्ल्याच्या मध्यभागी बालेकिल्ला असून तो पूर्वीच्या काळी मुख्य केंद्रबिंदू होता. आजही त्याची मजबूत तटबंदी अभिमानाने उभी आहे. याच आवारात तीन प्रचंड धान्यकोठारे आहेत. त्यापैकी दोन बहामनी काळात बांधले गेलेले, तर तिसरे काळ्या दगडात बांधलेले कोठार मराठाकालीन आहे. या धान्यकोठाऱ्यांमुळे किल्ला दीर्घकाळ शत्रूच्या वेढ्यात टिकून राहू शकत असे. संपूर्ण डोंगराभोवती पसरलेली पन्हाळ्याची भव्य तटबंदी नागमोडी वळणे घेत डोंगरशिखरांवरून पुढे सरकते. त्यामध्ये अनेक गुप्त दरवाजे व मार्ग लपलेले आहेत. तीन दरवाजा, वाघ दरवाजा, चार दरवाजा असे भव्य दरवाजे या किल्ल्याला आहेत. पैकी चार दरावाजा अस्तित्वात नाही. त्याशिवाय आंधार बाव ही बारमाही विहीर या किल्ल्यात आहे. वास्तू रचनेचा अनोखा अविष्कार या ठिकाणी दिसून येतो. तीन दरवाजाच्या वरती श्री. गजाननाचे शिल्प कोरलेले आहे. तर वाघ दरवाजातून खाली जात असताना डाव्या हातास पद्म, मयूर व वरती असलेले गरूड शिल्प हा किल्ला प्राचीन असल्याची साक्ष देत आहे. तटबंदीवर तब्बल ४० हून अधिक बुरुज उभे आहेत. त्यांपैकी काळा बुरुज आणि पुसाटी बुरुज हे विशेष उल्लेखनीय आहेत. मराठ्यांनी हे बुरुज अधिक मजबूत केले, तसेच तोफांसाठी उंच दमदमे उभारले. पन्हाळा हा फक्त लष्करी किल्ला नव्हता. त्याच्या आवारात आजही भव्य राजवाडे, मंदिरे आणि प्रशासकीय इमारतींचे अवशेष दिसतात. अंबारखाना, राजमाता ताराराणींचा राजवाडा आणि विशाल धान्यकोठारे हे त्या काळातील मराठ्यांच्या दूरदृष्टीचे आणि वास्तुकलेचे द्योतक आहेत. या इमारतींमधूनच किल्ल्याचे प्रशासन चालत असे.

**– संजय डी.ओरके**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.**

**'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंन्ड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.**
**वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.**
**मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे - ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.)** Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com